नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक
# यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - २ रे | Year - 2nd | अंक - १९१ | Issue - 191 | वार गुरुवार दि. २८ नोव्हेंबर २०२४ | Blow- Thursday Date 28 November 2024 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com | वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ | Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये | Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 | ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

## माझ्यामुळे सत्ता स्थापनेत कुठलीही अडचण नाही

### भाजपचा निर्णय मान्य : एकनाथ शिंदे; मुख्यमंत्री पदाचा निरोप घेताना एकनाथ शिंदे भावूक

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे : मी अडीच वर्षांच्या कारकीर्दीत समाधानी आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शहांना धन्यवाद देतो. शरीरातील शेवटच्या रक्ताच्या थेंबापर्यंत महाराष्ट्रासाठी काम करेल, असं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ठाण्यातील पत्रकार परिषदेत प्रतिपादन केले.

मुख्यमंत्रिपदाचा निरोप घेताना एकनाथ शिंदे हे भावूक झालेले दिसले. त्यांनी विधानसभा निवडणुकीसाठी कार्यकर्त्यांनी आणि त्यांनी केलेल्या कामाबाबत सांगितलं. मी एक कार्यकर्ता आहे आणि कार्यकर्ताच राहिल, असं ते म्हणाले. तसेच, मी स्वत:ला कधीही मुख्यमंत्री समजलं नाही तर एक सामान्य माणूस समजलं आणि म्हणून मी सामान्य माणसांमध्ये जाऊ शकलो, असंही ते म्हणाले.

यावेळी ते महायुतीच्या सत्ता स्थापनेबद्दलही बोलले. त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना फोन केल्याचं त्यांनी सांगितलं.

सत्ता स्थापनेचं घोडं कुठेही अडलेलं नाही, सगळ्या पदापेक्षा लाडका भाऊ हे मोठं पद आहे. मी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना फोन करून सांगितलं की, सरकार बनवताना कुठेही अडचण आहे असं मनात आणू नका, असे शिंदे म्हणाले. तुम्ही जो निर्णय घ्याल, तो मला मान्य असेल, असंही ते म्हणाले. मुख्यमंत्रिपदाबाबत भाजप जो निर्णय घेईल तो एकनाथ शिंदे आणि शिवसेनेला मान्य असेल, असे शिंदे यांनी यावेळी स्पष्ट केलं.

निकाल लागल्यापासून एकनाथ शिंदे यांनी मौन पाळलं होतं. त्यांनी माध्यमांशी बोलणं टाळलं, त्यांनी आमदारांशी भेटीगाठी टाळल्या त्यामुळे मुख्यमंत्रिपद न मिळाल्याने ते नाराज असल्याचं बोललं जात होतं. त्यावरही शिंदेंनी स्पष्ट उत्तर दिलं आहे. आम्ही असे नाराज होऊन रडणारे लोक नाही, लढणारे लोक आहोत. लढून काम



करणारे लोक आहोत. त्यामुळे मी स्वत: सांगतो की एवढा मोठा जो विजय झाला त्याची ऐतिहासिक गणणा होते, त्याचं कारण म्हणजे आम्ही जीव तोडून मेहनत केली, घरी बसलो नाही लोकांमध्ये गेलो. आम्ही मनापासून काम केलं.

मला काय मिळालं यापेक्षा महाराष्ट्रातील जनतेला काय मिळालं, काय सुख मिळालं, काय आम्ही देऊ शकलो हे आमचं उद्धिष्ट होतं. मला आनंद आहे की, लाडक्या बहीण, लाडक्या भाऊ कामाला लागले. गेल्या अडीच वर्षात जे प्रेम मिळालं, त्यांना वाटतं की हा आपल्यातला मुख्यमंत्री आहे. मी प्रत्येकाला भेटलो, जनतेतला मुख्यमंत्री म्हणून जी ओळख मिळाली त्याला फार नशीब लागतं, असंही शिंदे म्हणाले.

## संसदेत पुन्हा गदारोळ,दोन्ही सभागृहांमध्ये विरोधक आक्रमक

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : अदानी समूहाचे लाचखोरी प्रकरण, संभल हिंसाचार तसेच मणिपूरमधील हिंसाचार अशा अनेक मुद्द्यांवर संसदेच्या दोन्ही सदनांमध्ये विरोधक आक्रमक झाले. विरोधकांच्या गोंधळात दोन्ही सभागृहांचे कामकाज दिवसभरासाठी तहकूब करण्यात आले.

हिवाळी अधिवेशनाच्या दुसऱ्या दिवशी, बुधवारी लोकसभेचे कामकाज जेमतेम १५ मिनिटे झाले. सकाळी कामकाज सुरू होताच विरोधी पक्षांनी विशेषत: समाजवादी पक्षाच्या सदस्यांनी जबरदस्त घोषणाबाजी केली. संभलमधील हिंसाचाराच्या मुद्द्यावरून हे सदस्य लोकसभाध्यक्षांच्या आसनासमोर गोंधळ घालू लागल्याने लोकसभाध्यक्ष ओम बिर्ला यांनी सभागृह तहकूब केले. पीठासीन अधिकारी दिलीप सैकिया यांनीही विरोधकांना शांततेचे आवाहन केले पण, गोंधळ न थांबल्यामुळे कामकाज दिवसभरासाठी तबकूब झाले.

## थंडीची लाट येणार; राज्यात गारठा वाढला

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : उत्तरेकडून येणाऱ्या थंड वाऱ्यामुळे उत्तर महाराष्ट्र आणि मध्य महाराष्ट्रात पारा नऊ अंशांपर्यंत खाली आला आहे. बुधवारी (२७ नोव्हेंबर) नगरमध्ये राज्यात सर्वांत कमी ९.४ तर पुण्यात ९.९ अंश सेल्सिअस किमान तापमानाची नोंद झाली आहे. पुढील दोन दिवसांत नाशिक, नगर, पुण्यात थंडीची लाट येण्याची शक्यता हवामान विभागाने व्यक्त केली आहे. हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, उत्तरेकडून येणाऱ्या थंड वाऱ्याचा झंझावात वेगाने राज्यात येत असल्यामुळे राज्यात गारठा वाढला आहे.



बुधवारी नगरमध्ये सर्वांत कमी ९.४ अंश सेल्सिअसची नोंद झाली आहे. त्या खालोखाल पुण्यात ९.९, जळगाव ११.०, सातारा १२.०, औरंगाबाद १२.२, परभणी ११.६, नागपूर ११.७, गोंदिया ११.९ आणि अकोल्यात १३.६ अंश सेल्सिअस किमान तापमानाची नोंद झाली आहे. उत्तरेकडील थंड वाऱ्याचा जोर आणखी दोन दिवस कायम राहण्याचा अंदाज आहे. त्यामुळे उत्तर महाराष्ट्रातील नाशिक, नगर आणि मध्य महाराष्ट्रातील पुण्यात पुढील दोन दिवसांत थंडीची लाट येण्याची शक्यता निर्माण झाली आहे. त्या नंतर बंगालच्या उपसागरात तयार झालेल्या वादळामुळे राज्यात बाष्पयुक्त हवा येऊन थंडी काही प्रमाणात कमी होण्याचा अंदाज आहे. पण, सध्यातरी पुढील दोन दिवस थंडीत काहिशी वाढ होण्याची शक्यता हवामान विभागाचे शास्त्रज्ञ डॉ. एस. डी. सानप यांनी व्यक्त केली आहे.

## मुख्यमंत्रीपदाबाबत अमित शाह आणि विनोद तावडे यांच्यात चर्चा; भाजपा धक्कातंत्र अवलंबणार?

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : विधानसभा निवडणुकीत प्रचंड बहुमत मिळवल्यानंतर महायुतीमध्ये मुख्यमंत्रीपदावरून जोरदार रस्सीखेच पाहायला मिळाली. २३ नोव्हेंबर रोजी निकाल लागल्यानंतर मुख्यमंत्रीपदाबाबतचे मळभ दूर व्हायला चार दिवस लागले. काळजीवाहू मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काल (दि. २७ नोव्हेंबर) पत्रकार परिषद घेऊन मुख्यमंत्रीपदाबाबत पंतप्रधान मोदी जो निर्णय घेतील, तो आपल्याला मान्य असेल असे सांगितले. शिंदेंनी मुख्यमंत्रीपदावरचा दावा सोडल्यानंतर आता भाजपामध्ये मुख्यमंत्रीपदी कुणाला बसवायचे, याची चर्चा सुरू झाली आहे. भाजपाचे महाराष्ट्रातील नेते देवेंद्र फडणवीस यांच्या नावावर जोर देत असताना केंद्रीय नेतृत्व मात्र सर्व बाजूंचा विचार करताना दिसत आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह आणि भाजपाचे राष्ट्रीय सरचिटणीस विनोद तावडे यांच्यात काल याविषयावर दीर्घ चर्चा झाल्याची माहिती वृत्तवाहिन्यांनी दिली आहे. बुधवारी रात्री अमित शाह आणि विनोद तावडे यांच्यात ४० मिनिटे चर्चा झाली. बिगर मराठा मुख्यमंत्री केल्यास त्याचा मराठा मतांवर काय परिणाम होईल, याचा आढावा शाहांनी घेतला असल्याची माहिती मिळत आहे. आगामी निवडणुका, फडणवीसांचा चेहरा आणि मराठा-ओबीसी मतांबाबत शाहांनी माहिती घेतली. एकीकडे देवेंद्र फडणवीस यांचीच मुख्यमंत्रीपदी वर्णी लागणार अशी जोरदार चर्चा असताना केंद्रीय नेतृत्वाने राज्यातील समीकरणे जाणून घेतल्याबद्दल भाजपाकडून इतर राज्यांप्रमाणेच धक्कातंत्राचा वापर केला जाणार का? यावर आता राजकीय वर्तुळात चर्चा रंगली आहे.

मागच्या दोन वर्षांत भाजपाने इतर राज्यांमध्ये प्रस्थापित नेतृत्वाला बाजूला करून नवे नेतृत्व दिले आहे. मध्य प्रदेशमध्ये त्यांनी शिवराज सिंह चौहान यांच्या जागी डॉ. मोहन यादव, छत्तीसगडमध्ये रमण सिंह यांच्याऐवजी विष्णू देव साय, राजस्थानमध्ये वसुधंरा राजे यांच्याऐवजी भजनलाल शर्मा आणि हरियाणामध्ये मनोहरलाल खट्टर यांना बाजूला सारून नायब सिंह सैनी यांना मुख्यमंत्रीपद दिले गेले. भाजपाने इतर राज्यात ज्याप्रमाणे धक्कातंत्राचा वापर करून नवे नेतृत्व समोर आणले, तसाच प्रयोग महाराष्ट्रात होणार का? हे येणाऱ्या दिवसांत समजू शकेल.

दरम्यान, अमित शाह हे आता मुख्यमंत्रीपदाबाबत चर्चा करत असले तरी त्यांनीच विधानसभा निवडणुकीच्या प्रचारात देवेंद्र फडणवीस यांचा विजय करा, असे उद्गार शिराळा येथील सभेत काढले होते. या विधानामुळे महायुतीत काही वेळ चलबिचल पाहायला मिळाली होती. अमित शाह यांनी अप्रत्यक्षपणे भाजपाचा मुख्यमंत्री होणार असल्याचे संकेत दिले, असे त्यावेळी म्हटले गेले. त्यानंतर भाजपाने लगेच त्यावर स्पष्टीकरण देत सारवासारव केली.

## अदानींच्या अटकेची मागणी; सत्ताधाऱ्यांकडून संरक्षण मिळत असल्याचा कॉंग्रेसचा आरोप

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



नवी दिल्ली : गौतम अदानी आणि त्यांच्या पुतण्याविरुद्ध अमेरिकेने केलेल्या लाचखोरीचे आरोप नाकारून पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि अदानी यांची एकत्रित यंत्रणा सारवासारव करण्याचा प्रयत्न करत असल्याचा आरोप कॉंग्रेसने बुधवारी केला. तर, केंद्र सरकार अदानींचे संरक्षण करत असल्याचा आरोप लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी केला. संसदेबाहेर पत्रकारांशी बोलताना राहुल गांधी यांनी अदानी यांच्या अटकेची मागणी केली. अदानी समूहाने आरोप नाकारल्याबाबत विचारले असता राहुल म्हणाले की, ''तुम्हाला काय वाटते अदानी आरोप स्वीकारतील? कोणत्या जगात राहत आहात? स्वाभाविकच ते आरोप नाकारतील.'' अदानींविरोधातील आरोपांवर संसदेत तपशीलवार चर्चा केली जावी आणि सेबीसह अन्य तपास यंत्रणांनी या आरोपांची निष्पक्षपातीपणे चौकशी करावी अशी मागणी कॉंग्रेसने केली.

विधानसभेतील अपयशानंतर कॉंग्रेसचा महत्वाचा निर्णय

कॉंग्रेस विचारमंथनच्या बैठकीत निर्णय

## राहुल गांधींच्या नेतृत्वात ईव्हीएम विरोधात उभारणार जनआंदोलन : नाना पटोले

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : विधानसभेच्या निवडणुकीत महायुतीला मोठं बहुमत मिळालं. त्यामुळे राज्यात महायुतीच सरकार लवकरच स्थापन होईल. मात्र, विधानसभेच्या निवडणुकीत महाविकास आघाडीला मोठं अपयश आलं. मात्र, महाविकास आघाडीच्या पराभवानंतर आता ठाकरे गट, कॉंग्रेसच्या विचारमंथनाच्या महत्वाच्या बैठका पार पडत आहेत. तसेच विधानसभेच्या निकालाबाबत ईव्हीएमसंदर्भात महाविकास आघाडीकडून संशय व्यक्त केला जात आहे.

या पार्श्वभूमीवर कॉंग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी माध्यमांशी संवाद साधत बैठकीत नेमकी काय निर्णय घेण्यात आला? याविषयी माहिती सांगितली आहे. तसेच आता आम्ही बॅलेटवर मतदान घेण्याची मागणी करत पंतप्रधान, राष्ट्रपती आणि निवडणूक आयोगाच्या प्रमुखांना कोट्यवधी लोकांच्या सह्या पाठवणार असून यासंदर्भातील मोठी मोहीम राज्यात राबवणार आहोत, अशी माहिती नाना पटोले यांनी सांगितली आहे.

विधानसभेच्या निकालाला आता चार दिवस झाले आहेत. मात्र, अद्याप सरकार स्थापन झालं नाही. कोणाला मुख्यमंत्री करायचं हा 'मित्राचा' निर्णय होत नाही तोपर्यंत हे सरकार स्थापन होणार नाही. तसेच मित्राला महाराष्ट्र कसा विकता येईल? इकडे शेतकरी रोज आत्महत्या करतोय. शेतकरी आस लावून बसला आहे की सरकार आम्हाला काही मदत करेल. पण सरकार लक्ष द्यायला तयार नाही. भाजपाचे केंद्रातील जे नेते आहेत, त्यांचं महाराष्ट्र विकण्याचं



धोरण दिसत आहे. मित्राच्या आदेशाशिवाय मुख्यमंत्री कोणाला करायचं? अशा प्रकारचं वातावरण राज्यात पाहायला मिळतं आहे. याचा आम्ही निषेध करत आहोत, असं नाना पटोले यांनी म्हटलं. राज्यातील जनता एक प्रश्न विचारत आहे की, आम्ही त्यांना मतदान दिलं नाही तरीही हे सरकार निवडून कसं आलं? मी ही भूमिका आमच्या पक्षाचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे आणि राहुल गांधी यांच्याकडे मांडली. त्यावर मल्लिकार्जुन खर्गे यांनी सांगितलं की, ईव्हीएम मशीनची चर्चा करायची नाही. आता थेट बॅलेटवर निवडणुका व्हाव्यात अशी भूमिका आम्ही घेतली. याचं आम्ही एक मोठं जनआंदोलन राहुल गांधींच्या नेतृत्वात उभारणार आहोत. 'भारत जोडो यात्रे'सारखं मोठं जन आंदोलन देशात केलं जाईल, असं नाना पटोले यांनी म्हटलं.

महाराष्ट्रातील लोकांमध्येही मोठा उद्रेक आहे. आमचं मत देखील वाया चाललं आहे. आम्ही ज्याला मत देतो ते मत दुसऱ्याला चाललंय. अशी भावना लोकांची आहे. आता आम्ही असा निर्णय केला आहे की, दोन दिवसांनंतर राज्यात लोकांच्या सह्या घेण्याची मोहीम आम्ही घेत आहोत. तसेच बॅलेटवर मतदान घेण्याची मागणी करत पंतप्रधान नरेंद्र मोदी, भारताच्या राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, निवडणूक आयोगाच्या प्रमुखांना कोट्यवधी लोकांच्या सह्या पाठवणार आहोत. अशा प्रकारची मोठी मोहीम राज्यात आम्ही राबवणार आहोत. ही मोहीम लोकशाही वाचवण्याची मोहीम आहे, असं नाना पटोले यांनी म्हटलं.

## थोडक्यात

### शहर हद्दीतील ३५० व्यक्तींना वाहतूक केसेस वारंट बजावणी

**सोलापूर :** जिल्हा न्यायालय, सोलापूर यांचेकडुन पोलीस आयुक्तालयाकडे यापुर्वी वाहतूक केसेस संदर्भात समन्स प्राप्त झाले होते.त्या समन्सची बजावणी करुनही जे व्यक्ती न्यायालयात हजर झाले नाहीत,अगर त्यांनी दंडाची रक्कम भरणा केली नाही अश्यांवर जिल्हा न्यायालय, सोलापूर यांनी३५० व्यक्तींना वॉरंट काढले आहेत.पोलीस आयुक्तालय,सोलापूर शहर अंतर्गत पोलीस ठाणेकडुन ३५० वॉरंट बजावणीबाबत विशेष मोहिम राबविण्यात येत आहे. बुधवारी १३ वॉरंटची बजावणी करण्यात आली होती. त्याप्रमाणे सदर १३ इसमांनी वाहतूक केसेचे कायदेशीर दंडाची भरणा करुन जिल्हा न्यायालय, सोलापूर येथुन वॉरंट रद्द करुन घेतले आहेत. उर्वरित वॉरंट प्राप्त इसमांनी आपल्या वरील वाहतुक केसची दंडाची रक्कम भरणा करुन जिल्हा न्यायालय, सोलापूर येथुन वॉरंट रद्द करुन घ्यावे.अन्यथा आपले वाहतूक केसमधील वॉरंट मध्ये कायदेशीर अटकेची कारवाई केली जाईल.तसेच ज्यांना समन्स प्राप्त झाले आहेत.त्यांनी त्यांच्यावरील केसची कायदेशीर दंडाची रक्कम भरणा करुन कायदेशीर कारवाई टाळावी. असे आवाहन वपोनि. उदयसिंह पाटील यांनी केले आहे.

### अधिकाराचा गैरवापर ; चौघांविरुद्ध गुन्हा दाखल

**सोलापूर :** सोलापूर हद्दवाढ भागातील मजरेवाडी येथील बिनशेती खुली जागेवरील अर्जदाराचे नाव कमी न करता,परस्पर मोजणी करुन या मिळकतीचा सात बारा उताऱ्याची पोट हिस्से तयार करुन चौघांनी अधिकाराचा गैरवापर करुन इतर मिळकत धारकांना त्याचा फायदा करुन दिल्याची घटना घडली आहे.ही घटना १४/१०/२०२२ रोजी ते दि. ०९/११/२०२३ रोजी पर्यंत, उपअधिक्षक भुमी अभिलेख,ता.उत्तर यांचे कार्यालयात,जुने जिल्हाधिकारी कार्यालय,सोलापूर येथे घडली. सुनिल वसंतराव पोतदार (वय-६४,रा.घर नं.५२५,शुक्रवार पेठ,सोलापूर) यांच्या फिर्यादीवरून नितीन सावंत,तबस्सुम सय्यद,मुकुंद काडगावकर,श्रीशैल काळे या चौघाविरुद्ध सदर बझार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. यात अधिक हकिकत अशी की,फिर्यादी सुनील पोतदार यांनी सोलापूर हद्दवाढ भागातील मजरेवाडी येथील बिनशेती खुली जाग सर्व्हे नं. ३०६/१ यास नवीन सर्व्हे नं. १५४/१, या जागेचे एकुण क्षेत्र ०४ हे ७६ आर या मिळकतीवर फिर्यादी व फिर्यादीचे पाच चुलत भाऊ असे एकुण ६ जणांचे वारसाहक्काने मालकीचे संदर्भात अर्जदार यांचे नाव कमी का झाले नाही यांची कोणतीही खातरजमा केली नाही.तसेच अर्जदार यांना मोजणी प्रकरणाची कोणतीही कल्पना अथवा नोटीस न देता अर्जदार यांचे गैरहजर नमुद मिळकतीचा परस्पर मोजणी करुन या मिळकतीचा सात बारा उताऱ्याची पोट हिस्से तयार करुन वरील चौघांनी अधिकाराचा गैरवापर करुन इतर मिळकत धारकांना त्याचा फायदा करुन दिला आहे. तपास पोसई शिंदे करीत आहेत.

## संपादकीय....

### धक्कातंत्र

विधानसभा निवडणुकीत प्रचंड बहुमत मिळवल्यानंतर महायुतीमध्ये मुख्यमंत्रीपदावरून जोरदार रस्सीखेच पाहायला मिळाली. २३ नोव्हेंबर रोजी निकाल लागल्यानंतर मुख्यमंत्रीपदाबाबतचे मळभ दूर व्हायला चार दिवस लागले. काळजीवाहू मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी नुकतेच पत्रकार परिषद घेऊन मुख्यमंत्रीपदाबाबत पंतप्रधान मोदी जो निर्णय घेतील, तो आपल्याला मान्य असेल असे सांगितले. शिंदेंनी मुख्यमंत्रीपदावरचा दावा सोडल्यानंतर आता भाजपामध्ये मुख्यमंत्रीपदी कुणाला बसवायचे, याची चर्चा सुरू झाली आहे. भाजपाचे महाराष्ट्रातील नेते देवेंद्र फडणवीस यांच्या नावावर जोर देत असताना केंद्रीय नेतृत्व मात्र सर्व बाजूंचा विचार करताना दिसत आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह आणि भाजपाचे राष्ट्रीय सरचिटणीस विनोद तावडे यांच्यात काल याविषयावर दीर्घ चर्चा झाल्याची माहिती वृत्तवाहिन्यांनी दिली आहे. बुधवारी रात्री अमित शाह आणि विनोद तावडे यांच्यात ४० मिनिटे चर्चा झाली. बिगर मराठा मुख्यमंत्री केल्यास त्याचा मराठा मतांवर काय परिणाम होईल, याचा आढावा शाहांनी घेतला असल्याची माहिती मिळत आहे. आगामी निवडणुका, फडणवीसांचा चेहरा आणि मराठा-ओबीसी मतांबाबत शाहांनी माहिती घेतली. एकीकडे देवेंद्र फडणवीस यांचीच मुख्यमंत्रीपदी वर्णी लागणार अशी जोरदार चर्चा असताना केंद्रीय नेतृत्वाने राज्यातील समीकरणे जाणून घेतल्याबद्दल भाजपाकडून इतर राज्यांप्रमाणेच धक्कातंत्राचा वापर केला जाणार का? यावर आता राजकीय वर्तुळात चर्चा रंगली आहे. मागच्या दोन वर्षांत भाजपाने इतर राज्यांमध्ये प्रस्थापित नेतृत्वाला बाजूला करून नवे नेतृत्व दिले आहे. मध्य प्रदेशमध्ये त्यांनी शिवराज सिंह चौहान यांच्या जागी डॉ. मोहन यादव, छत्तीसगडमध्ये रमण सिंह यांच्याऐवजी विष्णू देव साय, राजस्थानमध्ये वसुधंरा राजे यांच्याऐवजी भजनलाल शर्मा आणि हरियाणामध्ये मनोहरलाल खट्टर यांना बाजूला सारून नायब सिंह सैनी यांना मुख्यमंत्रीपद दिले गेले.


# २८ नोव्हेंबर : महात्मा फुले स्मृतिदिन

महाराष्ट्रात आधुनिक चळवळीचा पाया घालण्याच काम महात्मा फुले यांनी केलं होतं,शेतकऱ्यांचा असूड या ग्रंथात एका अखंडाच्या माध्यमातून महात्मा फुलेंनी बहुजनांच्या अधोगतीचं कारण सांगितलं होतं,ते कारण म्हणजे अज्ञान होय. सदरील अखंडात महात्मा फुले लिहितात. विद्ये विना मती गेली, मती विना नीती गेली, नीती विना गती गेली, गती विना वित्त गेले, वित्ता विना शूद्र खचले, एवढे अनर्थ एका अविद्येने केले.या अखंडातून महात्मा फुलेंनी बहुजनांच्या अधोगतीच कारण स्पष्ट केलं होतं.

बहुजनांच्या अज्ञानाच कारण ओळखून महात्मा फुलेंनी त्या विरुद्ध जनजागृती करण्याच काम हाती घेतलं,आणि आपल्या सामाजिक कार्याची सुरुवात करत असताना स्त्री शिक्षणापासून केली.१ जानेवारी १८४८ साली महात्मा फुलेंनी पुणे येथील भिडे यांच्या वाडयात पहिली मुलींची शाळा सुरु केली होती. १८४८ साली फुलेंचे वयवर्ष फक्त २१ वर्ष होते, यावरून आपल्याला महात्मा फुलेंच्या बुद्धीमत्तेची प्रचिती येते.वयाच्या २१ व्या वर्षी बहुजनांना शिक्षित करण्यासाठी निघालेल्या तरुण महात्मा फुलेंना पुढे अनेक अडचणीचा सामना करावा लागलेला आहे.कारण त्या काळी स्त्रियांनी शिक्षण घेणे हे पाप मानले जाते होते, आणि त्यांना शिक्षण देणे हे महापाप मानले जाते होते. म्हणून कोणतेही पालक आपल्या मुलीला शाळेत पाठवायला तयार होत नव्हते. कारण धर्म मार्तंडांनी समाजाच्या मनात स्त्री शिक्षणाबद्दल भीती घातली होती. म्हणून महात्मा फुलेंना स्त्री शिक्षणाबरोबरच अजून एक काम हाती घ्यावं लागलं होतं ते म्हणजे स्त्री शिक्षणाच्या बाबतीत लोकांच्या मनात घातलेली भीती दूर करणे.

समाज मनातली स्त्री शिक्षणा संदर्भातली भीती दूर व्हावी, स्त्रियांनी शिक्षण घेतले तर कोणताही अनर्थ घडत नाही हे दाखवून देण्यासाठी महात्मा फुलेंनी त्यांच्या पत्नी सावित्रीमाई फुले यांना शिक्षणाचे धडे दिले. जोतिरावांच्या प्रभावाखाली सावित्रीमाई ही न डगमगता शिकल्या. आणि इतर महिलांनीही शिकावे म्हणून घराबाहेर पडल्या. आणि तिथून पुढे जोती सावित्रीचा स्त्री शिक्षणासाठीचा संघर्ष सुरु झाला.

महात्मा फुलेंची एकीकडे स्त्री शिक्षणाची चळवळ तर दुसरीकडे अस्पृश्यता निवारणाची चळवळ सुद्धा सुरु होती. सर्व माणसे ही एकाच निर्मिकाची लेकरे आहेत. म्हणून त्यांच्या मध्ये भेदभाव करणे चुकीचे आहे या विचाराने प्रेरित होऊन फुलेंनी अस्पृश्यता निवारण्याचे काम सुद्धा हाती घेतले होते. १८६३ साली स्वतःच्या घरातील पाण्याची विहीर व हौद अस्पृश्य समाजासाठी खुला केला होता. आधुनिक महाराष्ट्रात अस्पृश्यता निर्मूलनाचा हा पहिलाच क्रांतिकारी प्रयत्न होता.



अस्पृश्यता निर्मूलनाबरोबरच समाजातील अनिष्ठ रूढी परंपरा यावर ही महात्मा फुलेंनी प्रखर हल्ला केलेला आहे. सती प्रथा, केशवपण, बालविवाह, बालजरठ विवाह, वाघ्या मुरळी प्रथा, देवदासी प्रथा अश्या अनेक अनिष्ठ प्रथेच्या विरोधात महात्मा फुलेंनी जनजागृती केलेली आहे.केशवपणाच्या विरोधात पुण्यामध्ये नाभिकांचा संप घडवून त्यांचं प्रबोधन करण्याच काम केलं होतं.हा संप देशातील पहिला संप म्हणून ओळखला जातो.तत्कालीन कालखंडात शेतकऱ्यांच्या प्रश्नांना वाचा फोडण्याचं देखील काम महात्मा फुलेंनी केलं होतं, त्या काळात शेतकऱ्यांच्या परिस्थितीच वर्णन, शेतकऱ्यांच्या समस्या, अडचणी या शेतकऱ्यांचा असूड या ग्रंथात मांडल्या होत्या, शेतकऱ्यांच्या समस्या मांडणारे हे त्या काळातले पहिलेच पुस्तक होते.

महात्मा फुलेंनी १८८२ मध्ये हंटर कमिशन समोर प्राथमिक शिक्षण हे मोफत आणि सक्तीचे करावे ही मागणी केली होती, अशी मागणी करणारे महात्मा फुले हे भारतातील पहिले व्यक्ती होते. आज जे प्राथमिक शिक्षण मोफत आणि सक्तीचे मिळते या मागे महात्मा फुलेंचे योगदान आहे, हे लक्षात घेतले पाहिजे.२४ सप्टेंबर १८७३ ला सत्यशोधक समाजाची स्थापना करून निर्मिक (ईश्वर ) हा निर्गुण निराकार आहे, त्याची सेवा करण्यासाठी कोणत्याही मध्यस्थिची गरज पडत नाही हे तत्व मांडले, सत्यशोधक समाजाच्या वतीने शिक्षणाचा प्रचार प्रसार करण्याचे काम केले. विशेष म्हणजे सत्यशोधक समाज हा सर्व जाती धर्मासाठी खुला करण्यात आला होता.


उपरोक्त परिवर्तनाचे कार्य करत असताना त्यांना स्वतःच घर देखील सोडावं लागलं होतं,कारण महात्मा फुलेंच्या वडिलांना तत्कालीन धर्मठेकेदारांनी व जाती बांधवांनी वाळीत टाकण्याची धमकी दिली होती. म्हणून गोविंदराव यांनी जोतिरावांना सामाजिक कार्य सोडण्याचा किंवा मग घर सोडण्याचा पर्याय समोर ठेवला होता.अश्या परस्थिती मध्ये महात्मा फुलेंनी स्वतःचे घर सोडले पण हाती घेतलेले सामाजिक कार्य सोडले नाही.पुढे त्यांनी विस्मणात गेलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या समाधीचा जीर्णोद्धार करून पहिली शिवजयंती सुरु केली,शिवरायांवरती पहिला पोवाडा लिहिला, सत्यशोधक समाजाच्या माध्यमातून व पोवाडाच्या माध्यतुन शिवरायांना सर्वसामान्य लोकांपर्यंत पोहोचवण्याचे काम केले. बहुजन समाजाने शिकून वाचून स्वतःची प्रगती करावी म्हणून महात्मा फुलेंनी अनेक ग्रंथ देखील लिहिले त्या मध्ये तृतीय रत्न नाटक ' गुलामगिरी, शेतकऱ्यांचा असूड, ब्राह्मणांचे कसब, सार्वजनिक सत्यधर्म, इशारा, सत्सार इत्यादी ग्रंथ लिहिले.

एकंदरीत महात्मा फुलेंच्या सामाजिक कार्याचा आवाका लक्षात घेतल्यास महात्मा फुलेंची दूरदृष्टी लक्षात येते. सामाजिक कार्य चालू असताना फुलेंना अर्धांग वायू ने ग्रासले गेले आणि यातच त्यांचा २८ नोव्हेंबर १८९० साली मृत्यू झाला. अश्या या महान समाज सुधारकास २८ नोव्हेंबर स्मृतिदिनानिमित्त विनम्र अभिवादन. जय जोती जय क्रांती....

**साभार :– व्याख्याते परमेश्वर बनकर,
बीड (मो. ९५०३२८८२८२)**

# जिल्ह्यातील ११ विधानसभा मतदारसंघात जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या नियंत्रणाखाली निवडणुका यशस्वी....

भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार महाराष्ट्र विधानसभा सार्वजनिक निवडणूक २०२४ चा कार्यक्रम दिनांक १५ ऑक्टोबर २०२४ रोजी जाहीर झाला. त्यानुसार संपूर्ण राज्यासह सोलापूर जिल्ह्यातील अकरा विधानसभा मतदारसंघात दिनांक २० नोव्हेंबर २०२४ रोजी मतदान झाले तर दिनांक २३ नोव्हेंबर २०२४ रोजी मतमोजणीची प्रक्रिया पार पडली. दिनांक १५ ऑक्टोबर ते २३ नोव्हेंबर २०२४ या कालावधीत संपूर्ण निवडणूक प्रक्रिया जिल्ह्यात अत्यंत निर्भीड व शांततामय वातावरणात पार पडली. जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या कुशल नेतृत्वाखाली सर्व ११ विधानसभा मतदारसंघाचे निवडणूक निर्णय अधिकारी, जिल्हास्तरीय नोडल अधिकारी, उपजिल्हा निवडणूक अधिकारी, सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी यांनी ही प्रक्रिया यशस्वी करण्यात मोलाची भूमिका बजावली, ही संपूर्ण प्रक्रिया पार पाडण्यात जवळपास १८ हजार अधिकारी कर्मचारी यांनी आपले योगदान देऊन लोकशाहीचा हा उत्सव थाटात पार पाडला.



निवडणूक आयोगाने अधिसूचना जाहीर केल्यानंतर जिल्हा प्रशासनाने २४ तास, ४८ तास व ७२ तासात जिल्ह्याच्या शहरी व ग्रामीण भागातील सर्व राजकीय होर्डिंग पोस्टर बॅनर्स हाटवले. तसेच निवासी उपजिल्हाधिकारी मनीषा कुंभार यांनी आदर्श आचारसंहिता कक्ष प्रमुख म्हणून संपूर्ण जिल्ह्यात आदर्श आचारसंहितेची काटेकोर अंमलबजावणीबाबत जिल्हाधिकारी आशीर्वाद यांच्या मार्गदर्शनाखाली चांगले काम केले. जिल्हास्तरीय सर्व नोडल अधिकारी तसेच निवडणूक निर्णय अधिकारी व त्यांच्या अधिनस्त सर्व अधिकारी कर्मचारी यांचे प्रशिक्षण अत्यंत चांगले देण्यात आले, यासाठी उपजिल्हाधिकारी संतोषकुमार देशमुख यांनी विशेष प्रयत्न केले.

जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व निवडणूक यंत्रणा अत्यंत दक्ष राहून कामकाज करत होते. मतदार जनजागृती करण्यासाठी स्वीप अंतर्गत संपूर्ण जिल्हाभरात अत्यंत मोठ्या प्रमाणावर कार्यक्रम घेण्यात आले यासाठी स्वीप नोडल अधिकारी अतिरिक्त जिल्हाधिकारी मोनिका सिंह ठाकुर व जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक सुधीर ठोंबरे यांनी उत्कृष्ट नियोजन करून ज्या ठिकाणी लोकसभा निवडणुकांमध्ये कमी मतदान झालेले आहे अशा ठिकाणीही मतदार जागृती मोहीम राबवली. शालेय तसेच महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना जनजागृती मोहिमेत सहभागी करून घेण्यात आले. संपूर्ण जिल्हाभरात अत्यंत चोखपणे मतदार जनजागृतीचा कार्यक्रम घेण्यात आल्यामुळे सन २०१९ च्या विधानसभा निवडणुकांमध्ये ६४.५९ टक्के मतदान झालेले होते तर यावर्षी २० नोव्हेंबर २०२४ रोजी जिल्ह्यात ६७.७२% मतदान झाले मतदानाच्या एकूण टक्केवारी जवळपास तीन टक्के वाढलेली दिसून आली.

विधानसभेला लोकसभा निवडणूक २०२४ पेक्षा अधिक मतदान केंद्र ची संख्या झाली. विधानसभेला एकूण ११ विधानसभा मतदारसंघात ३७३८ मतदान केंद्रे होती. या सर्व मतदान केंद्रावर निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार किमान पायाभूत सोयीसुविधाचे निर्मिती केलेली होती. मतदाराला मतदान केंद्रावर येऊन सहज मतदान करता येईल या पद्धतीने मतदान केंद्राची निवड करण्यात आलेली होती तसेच प्रत्येक मतदान केंद्रावर मतदारांना कोणत्याही प्रकारचा त्रास होणार नाही यासाठी आवश्यक सर्व सोयी सुविधा उपलब्ध करून दिलेल्या होत्या. एकूण मतदान केंद्राच्या जवळपास ६० टक्के म्हणजेच २३०५ मतदान केंद्रावर वेब कास्टिंगची सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेली होती. या सुविधेमुळे संबंधित मतदान केंद्रावर कशा पद्धतीने मतदान केंद्राध्यक्ष व केंद्र अधिकारी मतदानाची प्रक्रिया राबवत आहेत याची माहिती जिल्हा नियंत्रण कक्षात जिल्हाधिकारी स्वतः पहात होते व आवश्यक त्या ठिकाणी निर्देश देत होते.

सी–व्हिजील कक्षात निवडणुकीच्या अनुषंगाने आलेल्या तक्रारीवर कक्षाच्या वतीने वेळेत तक्रारी संबंधितांपर्यंत पोहोचवून त्याचा निपटारा करण्यात आला. या कक्षाचे नोडल अधिकारी आशिष लोकरे यासाठी सातत्याने लक्ष ठेवून होते. तसेच विधानसभा स्तरावरील सर्व निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडून जिल्हा निवडणूक अधिकारी यांच्याकडे होणारे रिपोर्टिंग मुख्य निवडणूक अधिकारी महाराष्ट्र राज्य यांना कळविण्यासाठी महसूल उपजिल्हाधिकारी अमृत नाटेकर यांनी अत्यंत जबाबदारपूर्वक काम केले. तसेच जिल्हास्तरावर सर्व यंत्रणांनी विधानसभा स्तरावरील निवडणूक निर्णय अधिकारी व त्यांच्या अधिनस्त यंत्रणांना पूरक कामकाज करून ह्या निवडणुका यशस्वीपणे पार पाडण्यात सहकार्य केले. प्रत्येक यंत्रणेला दिलेली जबाबदारी अत्यंत काटेकोरपणे पार पाडून हा लोकशाहीचा उत्सव मोठ्या थाटात साजरा होण्यास प्रत्येकाने आपल्या परीने वाटा उचलला.

**प्राथमिक आरोग्य आणि भोजनाची सुविधा:–**

मतमोजणी परिसरात एखादी आरोग्याची समस्या उद्भवली तर त्यावेळेस त्याच्यावर ताबडतोब प्राथमिक उपचार करण्याकरता प्राथमिक उपचार किट तसेच म्बुलन्सची व्यवस्था मतमोजणी परिसरात करण्यात आली होती. परिसरात चहा, अल्पोहार आणि भोजन व्यवस्था ठेवण्यात आली होती. त्यामुळे कुठलाही प्रकारचा तणाव हा कर्मचारी अधिकारी आणि निवडणूक उमेदवार आणि त्यांच्या प्रतिनिधींवर आला नाही. या संपूर्ण मतमोजणी प्रक्रियेसाठी बंदोबस्तासाठी आलेल्या पोलिसांना ही आरोग्य व चहापाणी जेवणाची व्यवस्था करण्यात आलेली होती. सोलापूर मनपाच्या स्वच्छता विभागाकडून सातत्याने परिसराची स्वच्छता करण्यात येत होते.

**पोलीस सुरक्षा व्यवस्था :**

मतमोजणी ही शांततेत व सुरळीत पार पडावी व कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी संपूर्ण सुरक्षा व्यवस्था, आग प्रतिबंधक सुविधा यंत्रणा सज्ज ठेवण्यात आल्या होत्या. प्रत्येक मतमोजणी कक्षात, पुरेसा वीज पुरवठा व जनरेटर बॅकअप सुविधा देण्यात आली होती. मतमोजणी कक्ष आणि परिसरात चोख पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आले होते. चोख सुरक्षा व्यवस्थेमध्ये मतमोजणी निर्विघ्नपणे पार पडले.

मतमोजणी केंद्रावर राखीव कर्मचाऱ्यांची नियुक्ती :

मतमोजणी कामाकरिता राखीव अधिकारी आणि कर्मचार्यांची व्यवस्था करण्यात आली होती. तसेच स्ट्रांग रूममधून मतमोजणी कक्षामध्ये मतदान यंत्र पोहोचविण्यासाठी कलर कोडींग केलेले कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली होती. अतिशय शिस्तबद्ध पद्धतीने मतदान यंत्र नेण्यात येत होते.

**जिल्हा व विधानसभा निहाय माध्यम कक्षाची स्थापना:–**

मतदानाच्या दिवशी जिल्हास्तरीय माध्यम कक्ष जिल्हा नियोजन भवन येथून सुरू होते तर प्रत्यक्ष मतमोजणी दिवशी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या व्हीआयपी सभागृह येथून जिल्हास्तरीय माध्यम कक्षाचे कामकाज सुरू होते. अकरा विधानसभाच्या माध्यम कक्षाच्या नोडल अधिकारी यांच्याकडून माहिती घेऊन पत्रकारांना देण्यात येत होती. त्याप्रमाणेच विधानसभा स्तरावर पत्रकारांसाठी देखील अकरा मतमोजणी केंद्रावर पत्रकार कक्ष उभे करण्यात येऊन एका नोडल अधिकाऱ्याची नियुक्ती करण्यात आली होती. या कक्षामध्ये चहा, शुद्ध पाणी आणि भोजनाची व्यवस्था ठेवण्यात आली होती. या पत्रकार कक्षामध्ये दूरचित्रवाणी, इंटरनेट सुविधा, झेरॉक्स, संगणक, प्रिंटर अशा सर्व सुविधा पत्रकारांना पुरवण्यात आल्या. तसेच सर्व संबंधित मतदार संघातील फेरी निहाय येणारी आकडेवारी व्हाट्सअप ग्रुपवर पाठविण्याबरोबरच त्याची फेरी निहाय प्रत्यक्ष प्रत पत्रकारांना देण्यात येत होती.त्यामुळे पत्रकारांना अचूक आणि वेळेवर वार्तांकन करण्यासाठी मदत झाली.

अशा उत्कृष्ट सुविधामुळे संपूर्ण मतमोजणी प्रक्रिया उत्तमरित्या संपन्न झाली. याबाबत पत्रकारांनी कर्मचाऱ्यांनी आणि उमेदवाराच्या प्रतिनिधी देखील समाधान व्यक्त केले. सेवा सुविधा अधिक पुरवल्या की प्रत्येकाला काम करण्याची ऊर्जा मिळते. या हेतूने जिल्हाधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या संकल्पनेतून या दर्जेदार सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या.

जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी प्रत्येक निवडणूक निर्णय अधिकारी यांना मतमोजणी दिवशी नियुक्त करण्यात आलेले अधिकारी कर्मचारी यांना चांगल्या सुविधा देण्याबाबत वेळोवेळी मार्गदर्शन करण्यात आले होते. तसेच त्या सुविधा व्यवस्थितपणे दिल्या जात आहेत का नाही याची खात्री केली जात होती.

त्यामुळे २३ नोव्हेंबर २०२४ रोजी सकाळी आठ वाजता सर्व ११ विधानसभा मतदारसंघात मतमोजणी प्रक्रियेला सुरुवात झाली प्रथम पोस्टल मताची मोजणी करण्यात आली त्यानंतर ईव्हीएम मशीन मधील मतांची मोजणी करून फेरीनिहाय निकाल जाहीर करण्यात येत होते. जाहीर झालेल्या निकालाची प्रत तात्काळ माध्यम कक्षा देण्यात येत होती. जवळपास सर्व विधानसभा मतदारसंघात मतमोजणी प्रक्रिया वेळेत पूर्ण होऊन विजयी उमेदवारांना निवडणूक निर्णय अधिकारी यांनी निवडणूक निरीक्षक यांच्या उपस्थितीत प्रमाणपत्र दिले. लोकसभा निवडणूक २०२४ प्रमाणेच जिल्हा निवडणूक अधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या मार्गदर्शन व नियंत्रणाखाली विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ अंतर्गत मतदान व मतमोजणी सह सर्व निवडणूक प्रक्रिया सुरळीत आणि शांततेत पार पाडल्यामुळे जिल्हा प्रशासनाचे सर्व स्तरावरून कौतुक होत आहे.

**– सुनील सोनटक्के**
जिल्हा माहिती अधिकारी,
सोलापूर

# भाजपला पाठिंबा बाबतची चर्चा खोटी मला बदनाम करण्याचा कट : आ. डॉक्टर बाबासाहेब देशमुख



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : सांगोला येथील शेतकरी कामगार पक्षाची कोणाला पाठिंबा देत आहे याबाबत अद्याप कोणताही निर्णय घेतला नसल्याचे भाजपच्या पाठिंबा याबाबतची चर्चा आहे ती खोटी असून मला बदनाम करण्याचा कट असल्याची मत शाखाची नूतन आमदार डॉक्टर बाबासाहेब देशमुख यांनी व्यक्त केले.

सध्या मुंबईमध्ये स्वतः स्थापनेसाठी राजकीय घडामोडींना वेळ आला असून त्यामध्ये सांगोल्याचे नूतन आमदार डॉक्टर बाबासाहेब देशमुख यांनी भाजपला पाठिंबा दिला असलेले इलेक्ट्रिक इलेक्ट्रॉनिक मीडियावर सांगण्यात येत आहे याबाबत बोलताना आमदार डॉक्टर बाबासाहेब देशमुख यांनी मत व्यक्त केले आहे.

आमदार बाबासाहेब देशमुख पुढे म्हणाले की, मी शेतकरी कामगार पक्षाचा नूतन आमदार आहे जर कोणाला पाठिंबा द्यायचा असेल तर त्याबाबत निर्णय कोणाचा अधिकार आमच्या पक्षाने सरचिटणीस बाही जयंत पाटील यांना आहे मी पक्षाचा पाईक आहे, पक्ष जो निर्णय देईल तो मलाही बंधनकारक असणार आहे.

माहितीला विशेषता भाजपला मोठे यश मिळाले आहे त्यामुळे ते आम्हांशी कसे बोलवतील तर बहुमतासाठी गरज असली तर ते आमच्या पक्षाशी बोलले असते त्यांना मोहम्मद मिळाले आहे सध्या जे काही प्रसिद्ध होत आहे ते मला बदनाम करण्यासाठी प्रयत्न करीत असशील असे मला वाटत असल्याचेही त्यांनी सांगितले.

## बुलेटच्या धडकेत वृद्धाचा मृत्यू; बुलेटस्वरावर गुन्हा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर, (प्रतिनिधी) : भरधाव वेगाने बुलेट वाहन चालून वृद्धाच्या मृत्यूस कारणीभूत ठरल्याप्रकरणी एका जनाविरुद्ध फौजदार चावडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना २५ नोव्हेंबर रोजी रात्री छत्रपती शिवाजी चौक ते जुना पुना नाका दरम्यान घडली.याप्रकरणी अनिल अशोक पाटील (वय–३१–,रा.गोल्टन गेट,अवंती नगर) यांनी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून संदेश पंडित जोगे (रा.संतोष नगर) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. या घटनेची हकीकत अशी की, फिर्यादी यांचे वडील वरील ठिकाण्याहून सायकलीवरून जात असताना संदेश जोगे याने त्याच्या ताब्यातील दुचाकी बुलेट क्रमांक एमएच.१३.सीएफ.२७६४ ही भरधाव वेगाने व निष्काळजीपणाने चालवून फिर्यादी यांच्या वडिलांना गंभीर जखमी करत त्यांच्या मृत्यूस कारणीभूत झाला आहे. असे फिर्यादीत नमूद आहे.तपास स.पो.नि. पाटील हे करीत आहेत.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई–मेल – yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय :** सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे–३७ ■ **विभागीय कार्यालय :** प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

## थोडक्यात...

### तुझ्या पोटात वाढलेले मुल कोणाचे आहे म्हणत विवाहितेचा छळ; पतीसह पाच जणांवर गुन्हा

सोलापूर, (प्रतिनिधी) : सासरकडच्या मंडळींनी संगणमत करून तुझ्या पोटात वाढलेले मुल कोणाचे आहे?तू काळी आहेस तू आमच्या घरात आल्यापासून आमच्यात भांडणे सुरू झाली आहेत. भांडवलासाठी तुझ्या आई व भावंडांकडून दोन लाख रुपये घेऊन येण्यास सांगितले परंतु आमचे ऐकले नाही. तुझी आमच्याकडे नांदण्याची लायकी नाही. तुला आम्ही सासरी नांदण्यास आणणार नाही. असे म्हणत मानसिक व शारीरिक त्रास देऊन जाचहाट केल्याची फिर्याद रोहिणी मल्लिकार्जुन मगरूमखाने (वय-२१,रा.निराळे वस्ती, महादेव गल्ली, मुरारजी पेठ) यांनी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात दिली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून पती मल्लिकार्जुन, सासरे चंद्रकांत मगरूमखाने, सासू संगीता मगरूमखाने, दिर सागर (सर्व.रा.निराळे वस्ती, महादेव गल्ली,मुरारजी पेठ) व नणंद तेजस्विनी (रा.विजापूर,राज्य- कर्नाटक) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. ही घटना २९ नोव्हेंबर २०२२ ते ३० जून २०२४ पर्यंत दरम्यान निराळे वस्ती मुरारजी पेठ येथे घडली. या घटनेचा पुढील तपास पोलीस नाईक कामूर्ती हे करीत आहेत.

# तालुक्यातून जेवढे लीड मिळाले आहे तेवढी झाडे लावण्याचे नियोजन; आ. डॉ. बाबासाहेब देशमुख

## वृक्षारोपण या संकल्पावर सर्वत्र चर्चा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : सांगोला तालुक्यातील शेतकरी कामगार पक्षाची आमदार डॉक्टर बाबासाहेब देशमुख यांनी तालुक्यातून जेवढे लीड मिळेल आहे तेवढे झाडे लावण्याचे नियोजन त्यांनी केलेले आहे.

सांगोला निवडणूक झाल्यानंतर गुलालाची उधळण फटाके फोडून मिरवणुकी ही झाल्या नूतन विजयी उमेदवाराचे मोठमोठाली सत्कार ही सुरू झाली काहींना मुंबईला बोलवण्यात आले आहे परंतु सांगोल्यातील विजयी उमेदवार डॉक्टर बाबासाहेब देशमुख यांनी लगेच मतदार संघात जेवढे लीड मिळाले आहेत तेवढे झाडे लावण्याचे उपक्रम त्यांनी हाती घेतला आहे आमदारकीची शपथविधी झाल्यानंतर लगेच हा वृक्षारोपणाचा कार्यक्रम सुरू करणार असल्याचे नूतन आमदार डॉक्टर बाबासाहेब देशमुख यांनी सांगितले.



सांगोला विधानसभा मतदारसंघ म्हटले की डोळ्यासमोर स्वर्गीय गणपतराव देशमुख यांचे नाव येथे विक्रमी एकाच पक्षातून विजयी झालेले स्वर्गीय आबासाहेब राज्यभर प्रसिद्ध होते त्यांच्या निधनानंतर झालेल्या पहिल्याच निवडणुकीत स्वर्गीय आबासाहेबांनी नातू डॉक्टर बाबासाहेब देशमुख यांनी पुन्हा सांगोला तालुक्यावर लालबावटा फडकवला आहे पेशाने डॉक्टर असलेली बाबासाहेब यांनी आबासाहेब स्वर्गीय गणपतराव देशमुख यांच्या निधनानंतर तालुक्यातील शाखा पक्षांमध्ये झालेली नेतृत्वाची पोकळी भरून काढण्यासाठी मोठा प्रयत्न केला उत्सव सामान्याच्या अडीअडचणी जाणून घेऊन ते सोडवण्याचा प्रयत्न करीत असल्याचे मतदारसंघातील प्रत्येकाच्या सुखदुःखामध्ये त्यांचा घरापर्यंत जाऊन ते भेटत असेल त्यामुळे तालुका भर चर्चित झाली स्वर्गीय गणपतराव देशमुख यांची विचार घेऊन राजकारणात आलेली डॉक्टर बाबासाहेबांनी विधानसभेच्या विजयानंतर लगेच सामाजिक कामे करण्यावर भर दिला आहे विजय झाल्यानंतर लगेच त्यांनी तालुक्यातून जेवढे लीड मिळाले आहे तेवढे झाडे लावण्याचा नियोजन सुरू केलेला आहे या गावात जेवढे लीड मिळाला आहे त्या गावात एवढी झाडे लावण्याचा त्यांनी संकल्प केला आहे व ज्या गावात लीड मिळाली नाही



त्याही गावात सर्वपक्षीय कार्यकर्त्यांनी घेऊन वृक्षारोपणाचा कार्यक्रम घेणार आहेत त्यामुळे त्यांच्या या वृक्षारोपणा या संकल्प वर सध्या सर्वत्र चर्चा सुरू झाले मतदारसंघात डॉक्टर बाबासाहेब देशमुख हे २५ हजार ३८६ मतांनी आघाडी मिळवून विजयी झाले तेवढे झाडे ते लगेच लावणार असून ती झाडे जोपासण्यासाठी प्रयत्न करणार असल्याची त्यांनी बोलून दाखवले आहे.



## समाज कल्याण विभागाच्या वतीने संविधान दिन उत्साहात साजरा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर, (जिमाका) : दि. २६ नोव्हेंबर रोजी 'संविधान दिना निमित्ताने सहायक आयुक्त समाज कल्याण कार्यालयाच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क चौक, सोलापूर येथील पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून ,संविधानाच्या प्रास्ताविकेचे सामुहिक वाचन व संविधान अमृत महोत्सव वर्ष २०२४-२५ "घर घर संविधान " अभियानाबाबत मार्गदर्शन करण्यात आले. तसेच संविधानाबाबत शाहीर सुरेश खाडे यांनी पोवाडा गायना करून, विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले.

सदर कार्यक्रमास अतिरिक्त आयुक्त सोलापूर महानगरपालिका मा. संदीप कारंजे, समाज कल्याणचे सहायक आयुक्त श्रीमती सुलोचना सोनवणे, इतर मागास बहुजन कल्याण कार्यालयाचे सहायक संचालक श्रीमती मनिषा फुले, शासकीय वसतीगृहाचे गृहपाल व विद्यार्थी, सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण कार्यालयातील कर्मचारी, जिल्हा जात पडताळणी समिती कार्यालय, विविध आर्थिक विकास महामंडळे यांचे अधिकारी व कर्मचारी, तालुका समन्वयक तसेच समतादूत व मान्यवर उपस्थित होते.अशी माहिती सहायक आयुक्त समाज कल्याण सोलापूर श्रीमती सुलोचना सोनवणे यांनी दिली.

# मल्लिनाथ नंदेन, चालक संजय जाधव यांच्या सेवानिवृत्ती निमित्त आज सत्काराचे आयोजन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनिधी : एस.टी. महामंडळाच्या अक्कलकोट आगारातील हेड मेकॅनिक मल्लिनाथ नंदेन आणि चालक संजय जाधव - फुटाणे यांचा आज गुरुवार दिनांक २८ नोव्हेंबर २४ रोजी एस टी महामंडळाच्या अक्कलकोट आगारात आगार व्यवस्थापक नागेश जाधव साहेब यांच्या हस्ते आणि सोलापूर विभागाचे माजी यंत्र अभियंता लोंढे साहेब तसेच सहायक कार्यशाळा अधिक्षक संजय कांबळे यांच्या प्रमूख उपस्थितीत सत्कार





करण्यात येणार असल्याची माहिती कार्यक्रमाचे संयोजक अभिजीत काळे, राहुल होटकर, आणि टी.जी. काशेट्टी व वसंत बंडगर यांनी प्रस्तुत प्रतिनिधी शी बोलताना दिली.

आज गुरुवार दिनांक २८ नोव्हेंबर २४ रोजी सकाळी ११ वाजता आगारात अनेक मान्यवरांच्या उपस्थितीत सेवा निवृत्ती निमित्त सत्काराचा हा कार्यक्षम होणार असून या कार्यक्रमास एस.टी.चे अनेक आजी-माजी अधिकारी अणि कर्मचारी तसेच माजी वरीष्ठ लिपिक प्रकाश कोळी, संघटनेचे माजी अध्यक्ष मोहन शिंदे, माजी नगरसेवक विश्राम पटेल, आणि विश्राम पटेल मित्र परिवार उपस्थित राहणार आहेत. हेड मेकॅनिक मल्लिनाथ नंदेन यांनी अक्कलकोट आगारात तब्बल ३६ वर्षे यांत्रिक पदांवर सेवा बजावली असून चालक क्रमांक ३६१६२ संजय जाधव - फुटाणे यांनीही कोकण, सातारा, सांगली , या विभागात २९ वर्षे चालक पदावर एस टी महामंडळाची सेवा केले आहेत. प्रदिर्घ सेवेनंतर मल्लिनाथ नंदेन आणि संजय जाधव फुटाणे हे या महिन्याच्या अखेरीस सेवा निवृत्त होत असल्यामुळे त्यांचा सेवा निवृत्तीचा सत्कार आयोजीत करण्यात आला आहे. अशी माहिती अभिजीत काळे यांनी दिली. मल्लिनाथ नंदेन व संजय जाधव फुटाणे यांच्या सत्काराचा हा निरोप समारंभ कार्यक्रम संपल्या नंतर कार्यक्रम स्थळी सर्वांसाठी स्नेह भोजन आयोजित करण्यात आले असुन या स्नेह भोजनाचा ही सर्वांनी आस्वाद घ्यावा असे ही आवाहन संयोजकांनी केले आहे.

# आ. समाधान आवताडे यांचा ना. देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते सत्कार



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपूर मंगळवेढा विधानसभा मतदारसंघाचे माहिती अधिकृत उमेदवार आ. समाधान आवताडे निवडणुकीच्या विजयानंतर आणि माहितीचे ऐतिहासिक विजयानंत आ. समाधान आवताडे यांनी ना. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची मुंबई येथील सागर बंगल्यावर त्यांच्या निवासस्थानी भेट घेतली.

महाराष्ट्राचे दक्षिण काशी म्हणून ओळख असणाऱ्या श्रीक्षेत्र पंढरपूर मंगळवेढा मतदारसंघातील नवनिर्माण विजय मिळाल्यानंतर ना. देवेंद्र फडणवीस यांनीआ. समाधान आवताडे यांना सन्मान व शुभेच्छा दिली.

आ. समाधान आवताडे यांनी माहितीच्या तेथे मानवी याबद्दल त्यांनी त्यांचे अभिनंदन केले भगवंत श्री विठ्ठल व दामाजी यांची मूर्ती देऊन सत्कार केला. यावेळी इतर मतदारसंघातील विजय उमेदवार मान्यवर उपस्थित होते.

# भारतीय संविधाना मुळेच देशातील तमाम नागरिकांना उपेक्षित बहुजनांना त्यांचे मानवी हक्क मिळाले : एस.के.गायकवाड



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी/प्रतिनिधी : देशातील सामाजिक, राजकीय धार्मिक, शैक्षणिक परिस्थितीचा अभ्यास करून भारतीय संविधानाचे शिल्पकार महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहिलेल्या संविधानामुळेच देशातील तमाम नागरिकांना उपेक्षित बहुजनांना त्यांचे मानवी हक्क मिळाले असून देशाची राष्ट्रीय एकात्मता अबाधित आहे.असे प्रतिपादन रिपाइं (आठवले) चे जिल्हा समन्वयक तथा पत्रकार सामाजिक कार्यकर्ते एस.के.गायकवाड यांनी वागदरी ता.तुळजापूर येथे आयोजित कार्यक्रमात बोलताना केले. वागदरी ता.येथे ग्राम पंचायतीच्या वतीने २६ नोव्हेंबर संविधान दिनाच्या निमित्ताने येथील ग्राम पंचायत कार्यालयात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या प्रसंगी एस.के.गायकवाड बोलत होते. प्रारंभी सरपंच तेजाबाई शिवाजी मिटकर उपसरपंच सुरेखा भालचंद्र यादव यांच्या शुभहस्ते भारतीय घटनेचे शिल्पकार महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून सामुदायिक रीत्या संविधानाच्या उद्देशिकेचे वाचन करण्यात आले. यावेळी जेष्ठ कार्यकर्ते सेवा निवृत्त मुख्याध्यापक शिवाजी मिटकर गुरुजी, ग्रा.प.सदस्य ज्ञानेश्वर पाटील, अमोल पवार मिनाक्षीताई बिराजदार, उमेदीच्या सिआरपी विद्याताई बिराजदार, रोजगार सेवक रामसिंग परीहार, आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्ते चंद्रकांत वाघमारे, सादु वाघमारे, ग्रा.प.कर्मचारी ओंकार चव्हाण, आकाश झेंडारे सह ग्रामस्थ उपस्थित होते.

# रिपाइं शाखा भिमनगर दहिटणे वतीने संविधान दिन साजरा



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनीधी : भारतीय संविधान दिना निम्मित रिपाइं शाखा भिमनगर दहिटणे सोलापूरच्या वतीने भारतीय संविधानाचे निर्माते महामानव विश्वरत्न भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना विनम्र अभिवादन करण्यात आले व भारतीय संविधान उद्देशीकेचे सामुदायिक वाचन करण्यात आले.

संविधान दिनाच्या सर्व भारतीयांना मनःपूर्वक शुभेच्छा देण्यात आले.

यावेळी डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव अध्यक्ष अजय कांबळे समाधान मस्के यांच्या हस्ते भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्प हार आर्पण करण्यात आले अमरदिप युवक मंडळाचे सल्लागार ज्ञानेश्वर बनसोडे यांनी संविधान दिनाचे महत्त्व व कायदे विषय जजन जागृती करण्यासाठी भारतीय संविधानाचे प्रत्येकाने समजून घेणे आवश्यक आहे प्रमुख उपस्थितीत रिपाइं प्रसिद्ध प्रमुख दत्ता कांबळे, बॉबी बनसोडे, अजित कांबळे मोहन शिंगे, सिद्राम गायकवाड, मिलिंद बनसोडे, स्वप्नील कांबळे, मयूर उबाळे, आदर्श उबाळे, बुद्ध भुषण बनसोडे, शिवाजी राजगुरू,परिवार उपस्थित होते.

सुत्र संचालन अजित कांबळे यांनी केले तर आभार स्वप्नील कांबळे यांनी मानले.

**भाजपचे पश्चिम महाराष्ट्र संघटन मंत्री मकरंद देशपांडे यांच्याकडे मागणी**

**पत्राद्वारे केली मागणी**

# आ. रणजितसिंह मोहिते पाटील यांची भारतीय जनता पक्षातून हाकालपट्टी करा : जिल्हाध्यक्ष चेतन सिंह केदार सावंत

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : आ. रणजीत सिंह मोहिते पाटील यांची भारतीय जनता पक्षातून अकलपट्टी करा असे जिल्हाध्यक्ष चेतन शेख केदार सावंत यांनी केली आहे.

भारतीय जनता पक्षाचे विधानपरिषद आमदार रणजितसिंह मोहिते पाटील यांची भारतीय जनता पक्षातून अक्कलपट्टी करावी, अशी मागणी भारतीय जनता पार्टीचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे





यांच्याकडे भारतीय जनता पार्टी सोलापूर ग्रामीण पश्चिम जिल्हाध्यक्ष श्री बाळासाहेब उर्फ चेतन सिंह केदार सावंत यांनी केले आहे. सदरच्या पत्राची प्रत भाजपचे पश्चिम महाराष्ट्र संघटन मंत्री श्री मकरंद देशपांडे यांना देण्यात आलेले आहे.

सदर पत्रामध्ये श्री रणजीत सिंह मोहिते पाटील विधान परिषद सदस्य महाराष्ट्र राज्य मध्ये भारतीय जनता पार्टीने विधानपरिषद सदस्य पदी नियुक्ती केली होती परंतु आता झालेल्या विधानसभा निवडणूक २०२४ सार्वत्रिक निवडणुकीत माळशिरस २०१९ विधानसभेतील माहिती मधील भाजपचे अधिकृत उमेदवार श्री राम विठ्ठल सातपुते यांच्या विरोधात प्रचार करून कार्यकर्ते व मतदारांना माहिती मधील भाजपच्या अधिकृत उमेदवाराच्या विरोधात मतदान करण्यात प्रोत्साहित केलेले आहे.तरी श्री रणजितसिंह मोहिते पाटील यांना पक्षातून तात्काळ बडतर्फ करण्यात यावे असे पत्र जिल्हा अध्यक्ष चेतन सिंह केदार सावंत यांनी दिलेले असल्याने सोलापूर जिल्ह्याचे महाराष्ट्रामध्ये खळबळ माजलेले आहे.

# उगाव येथून महिला बेपत्ता

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/ प्रतिनिधी : निफाड तालुक्यातील उगाव येथील शेतमजूर राजेंद्र कारभारी ससाने यांची पत्नी मीना राजेंद्र ससाने वय ४८ या दिनांक २४/११.२०२५ रोजी सकाळी नऊ ते दहा च्या दरम्यान घरातून न सांगता निघून गेल्या असून बेपत्ता झाल्या आहेत

मीना राजेंद्र ससाने ह्या अंगाने सडपातळ असून रंग निमगोरा आहे नाक बस्के व केस काय आहेत अंगात हिरव्या रंगाची साडी व ब्लाऊज असून एका हातात पिशवी असून पायात चपला आहेत मीना राजेंद्र ससाने व पती



राजेंद्र कारभारी ससाने या दोघांचे घरगुती किरकोळ कारणावरून भांडण झाले होते.

त्यांचा सर्वत्र शोध घेऊ नये त्या आतापर्यंत सापडल्या नाहीत, अशी माहिती राजेंद्र ससाने यांनी दिली असून या घटनेची निफाड पोलीस स्टेशनला नोंद करण्यात आली आहे पोलीस निरीक्षक गणेश गुरव यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस नितीन सांगळे हे पुढील तपास करीत आहे, तरी तरी वरील वर्णनाची महिला कोणाच्या नजरेस पडल्यास निफाड पोलीस स्टेशन शी संपर्क साधावा.

## थोडक्यात...

### खाल्ली सर्दीची गोळी अन् घरात झाली चोरी

सोलापूर, (प्रतिनिधी) : सर्दी झाल्याने सर्दीची गोळी खाऊन फिर्यादी मनीषा नितीन चरकुपल्ली (वय-२४,रा.साखरपेठ) या झोपी गेल्यानंतर अज्ञात चोरट्याने त्यांच्या घरात प्रवेश करून तीस हजार रुपये किमतीचे सोन्याचे दागिने चोरून नेल्याची घटना २५ नोव्हेंबर रोजी घडली. याप्रकरणी मनीषा चरकुपल्ली यांनी जेलरोड पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली असून, त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. पुढील तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल गंगावणे हे करीत आहेत.

### पैशाचा अपहार करून ८७ लाखांची फसवणूक; डॉक्टरासह तिघांवर गुन्हा

सोलापूर, (प्रतिनिधी) : शासकीय रक्कम ८७ लाख २७ हजार ८९० रुपयांचा अपहार केल्याप्रकरणी डॉक्टरसह तिघांविरुद्ध जेलरोड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हि घटना २९ सप्टेंबर रोजी शांती चौकातील शासकीय तंत्रनिकेतन येथे घडली.

याप्रकरणी डॉक्टर दिलीप मच्छिंद्र घायतिडक (वय-५४,व्यवसाय-नोकरी समन्वयक तथा विभाग प्रमुख,स्थापत्य अभियांत्रिकी विभाग,रा.शासकीय तंत्रनिकेतन सोलापूर) यांनी जेलरोड पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून डॉ.अशोक लक्ष्मीशंकर उपाध्याय, राजशेखर मारुती कापसे व अनंत शिवाजी जाधव यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. याबाबत अधिक माहिती अशी की, डॉ.अशोक उपाध्याय यांनी राजशेखर व अनंत यांच्या मदतीने २९ ऑक्टोबर रोजी वरील रक्कम काढली. व वित्तीय अधिकारी नसताना धनादेशाचा गैरवापर करून संस्थेच्या बँक खात्यातील रक्कम आहरित करून शासनाची फसवणूक केली आहे. संचालक तंत्र शिक्षण विभाग कार्यालय पुणे यांनी कळविल्याप्रमाणे शासकीय तंत्रनिकेतन येथील वरील संशयित आरोपी यांच्यावर शासकीय पैशाचा अपहार केल्याबाबतची फिर्याद वरील संशयित आरोपींविरुद्ध देण्यात आली आहे. असे फिर्यादित नमूद आहे. पुढील तपास पोसई.डेरे हे करीत आहेत.

### तू काळी आहे म्हणत विवाहितेचा छळ; पतीसह सासूवर गुन्हा

सोलापूर, (प्रतिनिधी) : तू काळी आहेस. तू आमच्या घरामध्ये शोभत नाही. तुझ्या आई-वडिलांनी लग्नात आमचा मानपान केला नाही.आम्ही दुसरीकडे लग्न केले असते तर आम्हाला चांगला हुंडा पैसे आणि सोन्याचे दागिने मिळाले असते. तुला कसला आजार आहे. आमच्याकडून काय होणार नाही.तसेच तुझ्या आई-वडिलांकडून दोन लाख रुपये घेऊन ये तरच तुला आम्ही नांदवण्यास ठेवू असे म्हणत विवाहितेला उष्टे खाण्यास देऊन मारहाण करत जाचहाट केल्याची फिर्याद सारिका महादेव भांडेकर (वय-२५-,रा.आडवा नळ) यांनी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून पती महादेव भांडेकर, व सासू श्रीदेवी भांडेकर (रा.भंगे गल्ली,बुधवार पेठ सोलापूर) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.ही घटना १७ फेब्रुवारी २०२४ ते २ जून २०२४ रोजी पर्यंतच्या दरम्यान भंगे गल्ली बुधवार पेठ येथे घडली. या घटनेचा पुढील तपास पोलीस हवालदार पवार हे करीत आहे.

# अक्कलकोट विधानसभा : चपळगाव अन् वागदरी दोन्ही गटांतून आठ हजार मताधिक्य

## भाजपाचे निष्ठावंत प्रामाणिक कार्यकर्त्यांमुळे आणि सागर कल्याणशेट्टी यांचे यशस्वी नियोजन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनीधी : आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या चपळगाव जिल्हा परिषद गट व वागदरी जिल्हा परिषद दोन्ही गट मिळून भाजपला ८०११ मतांचे मताधिक्य मिळालेले आहे.

वागदरीत जिल्हा परिषद गटात प्रामाणिक भाजपा कार्यकर्ते व चपळगाव व वागदरी गटात कल्याणशेट्टी कुटुंबाचे वर्चस्व पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे.

लोकसभा निवडणुकीत भाजपला चपळगाव जिल्हा परिषद गटात यश मिळाले नव्हते. परंतु वागदरी जिल्हा परिषद गटात प्रामाणिक भाजपा कार्यकर्तेमुळे भाजप लीड होते भाजपने विधानसभा निवडणूकीत पुन्हा जोमाने काम करून चपळगाव गटातील चपळगाव २६७, हन्नूर १००८, किणी ७७०, चपळगाववाडी २७३ कुरनूर ३८३, अरळी २३७, डॉबरजकळगे १७९, किणीवाडी १९०, दर्शनाळ ७०, पितापुर ३१, बोरेगाव २६७, चेंगी ३३, असे ३ हजार ८७० मताधिक्य मिळालेले असून, बऱ्हाणपूरमध्ये काँग्रेसला २१२, नन्हेगावला ६२ असे केवळ दोन गावांत काँग्रेस पक्षाला मताधिक्य मिळाले आहे.

चपळगाव गटात ज्या ज्या वेळी कल्याणशेट्टी कुटुंबातील व्यक्ती निवडणूक रिंगणात असते, त्या त्या वेळी त्यांना मतदारांनी साथ दिलेले आहे. हे या निवडणुकीत पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे. चपळगाव गटात लोकसभा निवडणुकीत अडीच हजारांचे कॉग्रेस पक्षाला लीड गेले होते. याच गटात यदा ३८७० मताचे भाजपला लीड मिळाले आहे. तसेच वागदरी गटात लोकसभेला भाजप लीड होते. यंदा ४१४१ मताचे लीड भाजपला मिळाले आहे.



भाजपसाठी सिद्धेश्वर कल्याणशेट्टी, सागर कल्याणशेट्टी, अमर पाटील, विनोद मोरे, अमोल हिप्परगी, राहुल काळे बहीम पिरजादे, शहीद पिरलाई, विश्वनाथ दौडबाळे, गौरीशंकर दोड्याले, उमाकांत गाढवे, गौरीशंकर स्वामी, धोंडप्पा बिराजदार, डॉ. शरणू काळे, अजय सकट, अंकुश आध्य, चंद्रकांत चाटमुटगे, रवि शिरपुर, अंधणा हुलंगे आदीनी परिश्रम घेतले.

वागदरी जिल्हा परिषद मतदार संघात गेल्या सहा महिन्यांपासून सागर कल्याणशेट्टी यांच्या मार्गदर्शनाखाली बसवराज शेळके, प्रदीप जगताप यांनी भाजपा सर्व कार्यकर्ते यांना नियोजनबध्द कार्यक्रम आखून प्रचार केल्याने लोकसभा व विधानसभेत लीड घेता आले याच सोबत माजी जिल्हा परिषद सदस्य आनंद तानवडे हे देखील येन प्रचाराच्या वेळी आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या प्रचारात सक्रिय सहभाग घेऊन प्रचार केले त्यामुळे काही प्रमाणात मता मध्ये लीड झाले मात्र वागदरी जिल्हा परिषद गटात भाजपा लीड होण्यास सर्व कार्यकर्ते प्रामाणिक काम केल्याने ४१४१ मताने लीड मिळाले आहे.

वागदरी जिल्हा परिषद गटात बादोले २६०, पालापूर १८७ चोळसगात २३५, किरनळ्ळी १३२ बोरगाव १८३, सफळे १५३, सांगवी बु ३७०, सांगवी खु, ६५, शिरवळ ४१४ सदलापूर १२६ बणजगोळ २९, ममनायद ९६. शिरवळ वाडी १८२. वागदरी १०७९, भुरीकवटे २३६, खैराट ५. गोगाव २०९ असे वागदरी गटात तब्बल ४,१४१ इतके भाजपला लीड मिळाले आहे. याठिकाणी बसवराज शेळके, प्रदीप जगताप, कमलाकर सोनकांबळे , मधुकर सुरवसे, आनंद तानवडे, अप्पू बिराजदार, राजेंद्र बंदीछोडे, महादेव पोमाजी,, विरभद्र मंगाणे, धोंडप्पा यमाजी, सिद्धाराम कलबूर्गी,शरणप्पा मंगाने, लक्ष्मण भैरामडगी,प्रदीप पाटील सर, सुनील सावंत, संतोष पोमाजी,रवि पोमाजी, शाम बाबर, मुत्तन्ना दुधगी, शिवा नंजुंडे, काशप्पा मड्डे, प्रकाश पोमाजी, राजू मंगाणे, बसवराज पाटील, महादेव सोनकावडे, विरभद्र पुरंत, शिवशरण यमाजी, शिवाजी सावंत, परमेश्वर सावंत, राजू हुगगे, शरद पोतदार, बसवराज उंबराणे, जयश्री बटगेरी, शारदाबाई रोट्टे, लक्ष्मीबाई पोमाजी, राजू पोमाजी, मडेप्पा उंबराणे, सिद्धाराम धड्डे, राजू शिंदे, सौरभ उंबरे, रोहित शिंदे, रवि भीमपुरे, सचिन ठोंबरे, संजय चौगुले, दयानंद बुऱ्हाणपूरे, दैलप्पा सरसंबी, रवि बंदिछोडे, आकाश व्हनकोरे, जगदेवी मुरळी परमेश्वर खसगी छबा भटारे, अविरत पात्रे, राम चितली मल्लिनाथ पुलारी, प्रदीप पाटील, श्रीमंत कुंटोजी, वैजीनाथ वर्दे, सिद्धय्या मठपती, विठ्ठल कते, कल्याणराव बिराजदार मल्लिनाथ उणदे, शंकर गुमते, किरण पांढरे, सतीश कणमुसे, श्रीमंत कुंठोजी, मल्लिनाथ शिदोरे, स्वामींनाथ शिदोरे, सिद्धारम मठपती, सचिन घुगरे, महेश दिवटे, राज शहाणे, हणमंत घोदे, अप्पाशा किवडे, राजू किवडे, त्रिगुळे मामा,वैजनाथ वर्दे, स्वामी मेजर, सिद्धाराम किवडे, मल्लिनाथ फुलारी, विरभद्र स्वामी, सोमनाथ पाटील, शिवानंद पटणे, धोंडप्पा मुलगे, बाबासाहेब भोसले, रवि बंदिछोडे आदींनी परिश्रम घेतले.

**गोगांव मध्ये आमदार सचिन दादा कल्याणशेट्टी यांच्या विकास कामाला दिलेल्या निधीमुळे व लाडकी बहीण योजनाच्या प्रभावमुळे व गावातील अनेक वंचित घटकांना न्याय देण्यासाठी आमदार सचिन दादा कल्याणशेट्टी यांच्या मार्गदर्शनखाली मी व उपसरपंच कमलाकर सोनकांबळे, भाजपा तालुका उपाध्यक्ष प्रदीप जगताप यासर्वानी मिळून गावाच्या विकासासाठी काम करत आहोत आमच्यावर विश्वास ठेऊन गावात २०९ भाजपा लीड दिल्याबद्दल सर्वाचे आभारी आहे**

**सौ. वनिता सुरवसे , सरपंच गोगांव**

**सागर कल्याणशेट्टी यांच्या नियोजन आणि भाजपा कार्यकर्ता प्रामाणिक काम केल्याने वागदरी गटात भाजपा लीड मिळाले असून कुणी श्रेय घेण्याचा प्रयत्न करून नये, वागदरी गावांत फक्त आणि फक्त भारतीय जनता पार्टीच्या कार्यकर्ते रात्र दिवस कष्ट घेतल्यामुळे लीड मिळाले आहे. जनता काय दुधखुळी नाही, कोणत्या पुढाऱ्यांनी किती दिवे लावलेत हे जनतेला माहिती आहे मोठे नेते भाजप म्हणून दाखविले आणि त्यांचे समर्थक कॉंग्रेसचा खुलेआम प्रचार केले वागदरी जिल्हा परिषद गटात भाजप मझ्यामुळे लीड झालेत म्हणून मिरविणाऱ्या नेत्याचा गावांत किती लीड मिळालेत हे एकदा तपासून बघावे.**

**– सुनील सावंत, भाजपा कार्यकर्ता, वागदरी**

# शासकीय निवासी शाळा नंगपुरामुर्री येथे संविधान दिवस साजरा



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

गोदिंया/प्रतिनिधी : तालुक्यातील नंगपुरामुर्री येथील अनुसूचित जाती व नवबौद्ध मुलांची शासकीय निवासी शाळेत २६ नोव्हेंबर संविधान दिवस मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात आला.

यावेळी शाळेचे मुख्याध्यापक रविशंकर इठूले यांच्या अध्यक्षतेखाली शाळेतील शिक्षक अस्मिता तेलंग, साधना पारधी, मन्नाभाई नंदागवळी, कार्तिक शहारे, स्वाती राणा, प्रगती खोब्रागडे अर्चना चव्हाण व तुषार महाजन आदी उपस्थित होते.

याप्रसंगी संविधान शिल्पकार डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या अध्यक्षतेखाली प्रतिमेला माला अर्पण करून, दीपप्रज्वलन करून अभिवादन करण्यात आले. प्रास्ताविक वाचन करण्यात आले. रांगोळी स्पर्धा घेण्यात आली. वक्तृत्व स्पर्धा तसेच निबंध स्पर्धा घेण्यात आली.

यावेळी कार्यक्रम यशस्वीतेसाठी विद्यार्थी व शिक्षक यांनी परिश्रम घेतले.

**प्रास्ताविकेचे वाचन : विविध स्पर्धा आयोजन**




**२६ नोव्हेंबर, संविधान साकारला रांगोळीमधून...!**

अनुसूचित जाती व नवबौद्ध मुलांची शासकीय निवासी शाळा नंगपुरामुर्री या शाळेत २६ नोव्हेंबर २०२४ रोजी संविधान दिनाच्या निमित्ताने रांगोळी स्पर्धा घेण्यात आली. त्यावेळी शाळेतील विद्यार्थी, शिक्षक तसेच कंपनी कर्मचारी यांनी भारतीय संविधान रांगोळीमधून साकारण्यात आले.

**छायाचित्र – मुन्नाभाई नंदागवळीबारा, गोदिंया**

# रेणुका कॉलेज ऑफ एज्युकेशन रेणापूर येथे संविधान दिन उत्साहात

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

रेणापूर/प्रतिनिधी, सुधाकर रणदिवे : रेणुका कॉलेज ऑफ एज्युकेशन रेणापूर ता .रेणापूर जि.लातूर येथे संविधान दिनाचे अमृत महोत्सव वर्ष साजरा करण्यात आले.या वेळी महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून व संविधान प्रास्ताविकेचे सामूहिक वाचन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून प्राचार्य डॉ. कैलास मोटे सर व प्रा.उत्तम दुधभाते सर हे उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रेणुका अध्यापक विद्यालय, रेणापूरचे प्राचार्य शशिकांत चिलरगे हे होते.

यावेळी डॉ. हिरकन शेटकर, प्रा.रतन लहाने, प्रा रमाकांत गायकवाड, राधिका माने, ग्रंथपाल मनीषा लातूरकर, इ उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.उमेश रणदिवे यांनी केले. सूत्रसंचालन डी. एल.एड.छात्र अध्यापिका कु.वैष्णवी सुरवसे यांनी तर आभार प्रदर्शन कु.श्रध्दा चव्हाण यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी अजय बद्दर, दत्ता चादरे आणि बी एड,डी. एल.एड च्या छात्र अध्यापकांचे सहकार्य लाभले.




**भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे सामुहिक वाचन**

**भारतीय संविधानाच्या प्रतिकृतीचे उद्घाटन**

# भारतीय संविधान ७५ वर्ष पूर्ण झाल्याने उल्हासनगर महानगरपालिकेच्या वतीने सांस्कृतिक कार्यक्रम

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

उल्हासनगर, प्रतिनिधी/बाळासाहेब अहिरे : भारतीय संविधान निर्मितीस ७५ वर्ष पूर्ण झाल्याबाबत भारतीय संविधान निर्मितीचा इतिहास सांस्कृतिक कार्यक्रमाच्या माध्यमातून नागरिकांना ज्ञात करून देणेसाठी बांधी फाऊंडेशन आणि उल्हासनगर महानगरपालिका यांचे संयुक्त विद्यमाने संविधान निर्मितीचा अमृत महोत्सव मंगळवार, दिनांक २६ नोव्हेंबर, २०२४ रोजी शहिद जनरल अरूणकुमार वैद्य सभागृह (टाऊन हॉल), उल्हासनगर-३ येथे सायंकाळी ६:०० ते रात्री ९:०० दरम्यान आयोजित करण्यात आला.

कार्यक्रमाची सुरूवात मा.श्री. दिनेश वाघमारे (भा.प्र.से.), प्रधान सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधो द्रव्ये व मा.श्री.सी.एल.थूल, माजी न्यायमुर्ती. महापालिका प्रशासक तथा आयुक्त श्री. विकास ढाकण, मा. आमदार सौ. सुलभा गायकवाड, श्रीम. अर्चना खोब्रागडे, संचालिका, बोधी फाऊंडेशन यांचे हस्ते दीप प्रज्वलाने करण्यात आली.

दीप प्रज्वलनानंतर भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे सामुहिक वाचन डॉ. ललित खोब्रागडे, सहायक संचालक नगररचना यांनी करून घेतले. त्यानंतर ४.५ फुटाच्या भारतीय संविधानाच्या प्रतिकृतीचे उद्धाटन मा.श्री. दिनेश वाघमारे (भा.प्र.से.) प्रधान सचिव व मा.श्री. सी.एल.थुल, माजी न्यायमुर्ती तथा अध्यक्ष अनु. जाती-जमाती आयोग यांच्या हस्ते करण्यात आले. सदर कार्यक्रमाचे प्रास्ताविक अतिरिक्त आयुक्त श्री. जमीर लेंगरेकर यांनी सादर केले.

मा.श्री.सी.एल.थुल, माजी न्यायमुर्ती तथा अध्यक्ष अनु. जाती-जमाती आयोग व मा.श्री. दिनेश वाघमारे (भा.प्र.से.) प्रधान सचिव यांनी भारतीय संविधानाबाबतचे आपले मनोगत अतिशय मार्मिक व अभ्यासपूर्वक सादर करून प्रेक्षकांना संविधानाबाबत प्रबोधन केले. मा. प्रशासक तथा आयुक्त श्री. विकास ढाकणे यांनी संविधाना विषयी अध्यक्षीय भाषण सादर करून संविधाबाबत प्रेक्षकांच्या ज्ञानात भर घातली. त्यानंतर श्री. प्रसेनजित, श्री. अभिजीत कोसंबी बंधू, मोनल कडलक, कोमल धांडे यांनी देशभक्तीपर व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यावर गीते सादर करून प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले.

सदर कार्यक्रमास मा.श्री. दिनेश वाघमारे (भा.प्र.से.) प्रधान सचिव व मा.श्री.सी.एल.थूल. माजी न्यायमुर्ती तथा अध्यक्ष अनु. जाती-जमाती आयोग, सौ. सुलभा गायकवाड, विभानसभा सदस्य (कल्याण पूर्व), श्रीम. अर्चना खोब्रागडे, संचालिका, बोधी फाऊंडेशन, प्रा. डॉ. प्रदिप जगताप, श्री. रमेश जंजाळ, महाराष्ट्र राज्य संघटक, अधिकारी/कर्मचारी संघटना, कार्यक्रमाचे सादरकर्ते श्री. महागायक सारेगमप श्री. अभिजित कोसंबी, पाश्र्श्वगायक-सूर नवा ध्यास नवा, सारेगमप, इंडियन आयडॉल फेम श्री. प्रसेनजित कोसंबी, निवेदक प्रा. डॉ. सत्यजित कोसंबी, गायिका मोनल कडलक व कोमल धांडे तसेच महापालिका प्रशासक तथा आयुक्त श्री. विकास ढाकणे, अतिरिक्त आयुक्त श्री. जमीर लेंगरेकर, सहायक संचालक, नगररचना डॉ. ललित खोब्रागडे, मुख्य लेखाधिकारी श्री. किरण भिलारे, मुख्य लेखा परीक्षक श्री. शरद देशमुख, सहायक आयुक्त मयुरी कदम, अजय ढोबळे, जनसंपर्क अधिकारी सौ. छाया डांगळे, भांडार विभाग प्रमुख श्री. अंकुश कदम, विधी विभाग प्रमुख श्री. राजा बुलानी व इतर महापालिका अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते. सदर कार्यक्रमाचे सुत्रसंचालन कार्यक्रमाचे निवेदक प्रा. डॉ. प्रदिप जगताप यांनी केले.

